महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाकडून पुरविण्यात येणाऱ्या तांत्रिक मनुष्यबळास मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभाग
शासन निर्णय क्र.मातंसं-२०२२/प्र.क्र.४७/से-२/३९
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२
दिनांक: ०३ ऑक्टोबर, २०२५

वाचा :- १) शासन निर्णय सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभाग क्र.मातंसं-१७१६/प्र.क्र.२८६/३९, दिनांक ०९.०८.२०१६
२) शासन निर्णय सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभाग क्र.मातंसं-१७१६/प्र.क्र.४७/३९, दिनांक २७.०९.२०२२

प्रस्तावना:-

संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयाव्दारे महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंळाचा स्थापना करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयाच्या परिच्छेद क्र.३.४ मध्ये विहित केलेल्या तरतुदींनुसार हे महामंडळ राज्य शासनाचे सर्व विभाग व त्यांच्या अधिनस्त कार्यालये, सार्वजनिक उपक्रमे, महामंडळे तसेच केंद्र अथवा राज्याने पारित केलेल्या अधिनियमानुसार स्थापित कंपन्या तसेच संस्था यांचे साठी माहिती तंत्रज्ञान/ माहिती तंत्रज्ञान सहाय्यित सेवांकरिता मनुष्यबळ पुरवठा करणारी राज्याची एकमेव यंत्रणा आहे. संदर्भ क्र.२ अन्वये माहिती व तंत्रज्ञान महामंडळाकडून तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करण्याबाबत सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभागाने महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित (महाआयटी) यांच्याकडून माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान सहाय्यीत सेवांकरीता तांत्रिक मनुष्यबळ पुरविण्याकरीता निविदा प्रक्रिया करुन त्यामध्ये सात संस्थांचा पॅनलमध्ये समावेश करण्यात आला होता. सदर शासन निर्णय हा दि.०१.१०.२०२२ पासून पुढील ३ वर्षाकरिता म्हणजेच दि.३०.०९.२०२५ पर्यंत वैध आहे. तद्नंतर सदर शासन निर्णयानुसार मनुष्यबळ पुरविता येणार नाही.

वरील परिस्थिती विचारात घेवून यापुढील कालावधीसाठी निविदा प्रक्रिया राबविणे व संस्थांची निवड करुन अंमलबजावणीसाठी लागणारा वेळ लक्षात घेता संदर्भ क्र.२ येथील दि.२७.०९.२०२२ रोजीच्या शासन निर्णयास मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. संबंधित शासन निर्णय पुढील ३ महिन्यांसाठी म्हणजेच दि.३०.१२.२०२५ पर्यंत वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय :-

माहिती व तंत्रज्ञान महामंडळाकडून तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करण्याबाबत सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभागाने महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित (महाआयटी) यांच्याकडून माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान सहाय्यीत सेवांकरीता तांत्रिक मनुष्यबळ पुरविण्याकरीता निविदा प्रक्रिया करुन सात संस्थांचा पॅनलमध्ये समावेश करण्यात आला होता. बऱ्याचशा प्रशासकीय विभागात दि.२७.०९.२०२२ च्या शासन निर्णयानुसार कंत्राटी पध्दतीने माहिती तंत्रज्ञान क्षेत्राशी निगडीत मनुष्यबळ कार्यरत आहे. हा शासन निर्णय दि.३०.०९.२०२५ वैध असून तद्नंतर प्रशासकीय विभाग व क्षेत्रिय कार्यालयाने या शासन निर्णयाच्या आधारे घेतलेल्या मनुष्यबळ सेवा खंडीत होणार आहेत. त्यामुळे विभागांच्या व त्यांच्या अखत्यारीतील क्षेत्रीय कार्यालयांच्या कामकाजात खोळंबा निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

संदर्भाधिन क्र.२ येथील शासन निर्णयानुसार मनुष्यबळ पुरविण्याचा कालावधी दि.३०.०९.२०२५ रोजी संपत असल्यामुळे पुढील कालावधीसाठी निविदा प्रक्रिया राबविणे व संस्थांची निवड करुन शासनास अहवाल सादर करण्याबाबत व्यवस्थापकीय संचालक, महाआयटी यांना दि.१३.०८.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ यांनी त्यांचे दि.१०.०९.२०२५ रोजीच्या पत्रान्वये नवीन तांत्रिक मनुष्यबळासाठी निविदा प्रक्रिया राबवून संस्थांची निवड करुन व उच्चाधिकार समितीची मान्यता घेण्यासाठी अतिरिक्त कालावधी लागणार असल्याचे कळविले आहे.

उपरोक्त परिस्थिती विचारात घेता मनुष्यबळ पुरविण्यासाठीची निविदा प्रक्रिया राबविणे व संस्थांची निवड करुन अंमलबजावणीसाठी लागणारा वेळ लक्षात घेता संदर्भ क्र.२ येथील दि.२७.०९.२०२२ रोजीच्या शासन निर्णयास ३ महिन्यांसाठी मुदतवाढ म्हणजेच दि.३०.१२.२०२५ पर्यंत देण्यात येत आहे. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाकडून मनुष्यबळ पुरविण्याची निविदा प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही विहित कालमर्यादेत पुर्ण झाल्यास सदर प्रक्रियेस शासन मान्यता प्राप्त करुन त्यानुसार शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल. सदरचा शासन निर्णय ज्या दिनांकास निर्गमित होईल त्या दिनांकापासून दिनांक २७.०९.२०२२ च्या शासन निर्णयास दिलेली मुदतवाढ संपुष्टात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५१००३१७३००५२६०७ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

EKNATH KASHINATH GAGARE

Digitally signed by EKNATH KASHINATH GAGARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=General Administration Dep., 2.5.4.20=D9A3CCBC053D2CF9B4C30C85BB8DB0E6C39331B90D48B0ABA6CDE387B5EC208C, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6BC79F4A08CA2D5D74E02E7214F6AAD4EF7D9AFDEBA5BFCDEF24D45049099939, cn=EKNATH KASHINATH GAGARE
Date: 2025.10.03 19:26:42 +05'30'

(एकनाथ गागरे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) राज्यपालांचे सचिव,
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३) महाराष्ट्र विधान परिषद सभापती यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
४) महाराष्ट्र विधान सभा अध्यक्ष यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
५) उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
६) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
७) विरोधी पक्ष नेता, विधान परिषद, विधान भवन, मुंबई
८) विरोधी पक्ष नेता, विधान सभा, विधान भवन, मुंबई
९) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
१०) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
११) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,
१२) प्रबंधक, उच्च न्यायालय (मुळ शाखा) मुंबई,
१३) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा) मुंबई,
१४) प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,

१५) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१६) महालेखापाल १/२ लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१७) महालेखापाल १/२ लेखा व परीक्षा, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१८) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१९) सर्व पोलीस आयुक्त,
२०) सर्व विभागीय आयुक्त,
२१) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२२) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य,
२३) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
२४) सर्व जिल्हाधिकारी,
२५) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२६) सर्व नगरपालिका/परिषदांचे मुख्याधिकारी,
२७) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित,
२८) सर्व मंत्रालयीन विभाग,
२९) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण, मुंबई,
३०) मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
३१) सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
३२) निवडनस्ती (का. मातं)..
३२) निवडनस्ती.